आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी – वेळ सायंकाळी ६.००)
बुधवार, दिनांक : ०१ मे, २०२४

ठळक बातम्या

1. सर्वांनी एकत्र येऊन समृद्ध आणि बलशाली महाराष्ट्र घडविण्याचं राज्यपाल रमेश बैस यांचं महाराष्ट्र दिनी आवाहन.
2. महाराष्ट्राने देशाच्या विकासात सामाजिक सुधारणांचा भक्कम पाया रोवला - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन, नागपूरसह विदर्भात महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा.
3. नागपूर शहरातील वाहतूक सुधारणांसोबतच पार्किंगचा प्रश्न प्राधान्यानं सोडवा - विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांचे निर्देश.

4. 43 पूर्णांक 9 अंश सेल्सियससह अकोला जिल्हा विदर्भात सर्वाधिक उष्ण - दुपारी बाहेर न पडण्याचं नागरिकांना आवाहन.

#########

महाराष्ट्र दिन

उद्यमशील, पुरोगामी, व्यावहारिक आणि कठोर परिश्रम करणारे नागरिक ही महाराष्ट्राची मोठी शक्ती असून आपण सर्वांनी एकत्र येऊन समृद्ध आणि बलशाली महाराष्ट्र घडवूया, असं आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी केलं. महाराष्ट्र राज्याच्या 65 व्या स्थापना दिनानिमित्त मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर आयोजित मुख्य शासकीय समारंभात राज्यपालांच्या हस्ते ध्वज फडकविण्यात आला. यावेळी त्यांनी महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनानिमित्त राज्यातील नागरिकांना शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी प्राणांचं बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना त्यांनी भावपूर्ण आदरांजली अर्पण केली.
महाराष्ट्र दिनानिमित्त आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीं मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा, यासाठी आपल्या प्राणांचं बलिदान देणाऱ्या १०५ हुतात्म्यांच्या स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करून विनम्रपणे अभिवादन केलं.
विधान भवन, मुंबई इथं महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या हस्ते आणि महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला.
महाराष्ट्र दिनाच्या निमित्तानं हुतात्मा चौक इथं माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी रात्री पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केलं.

## महाराष्ट्र दिन

विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांत आज महाराष्ट्र राज्याचा ६५ वा स्थापना दिन उत्साहात साजरा झाला. नागपुरात उपमुख्यमंत्री आणि नागपूरचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कस्तुरचंद पार्कवर मुख्य ध्वजारोहण सोहळा पार पडला. महाराष्ट्रानं देशाच्या विकासात सामाजिक सुधारणांचा भक्कम पाया रोवला आहे. राज्यानं औद्योगिक क्षेत्रातही मोलाचं योगदान दिलं आहे. महाराष्ट्र दिनाच्या औचित्यानं आपण सिंहावलोकन करून समृद्ध राज्य घडवण्याचा संकल्प करूया, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपुरात केलं. स्थानिक कस्तुरचंद पार्क मैदानावर आयोजित महाराष्ट्र दिनाच्या मुख्य शासकीय समारंभात फडणवीस बोलत होते. आज नागपूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते तुषार सोमलवार यांना आदर्श तलाठी पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

अमरावतीत विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडलं. यवतमाळ इथं ध्वजारोहण कार्यक्रमात बोलताना महाराष्ट्र हे विविध प्रथा, परंपरांनी नटलेलं समृद्ध राज्य आहे. इथली साहित्य, संस्कृती, कला, संगीत, समृध्द गडकिल्ले हे महाराष्ट्राचे वैभव आहे. अशा राज्यात आपण वास्तव्य करतो, ही आपल्यासाठी देखील गौरवाची बाब आहे, असं प्रतिपादन यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांनी ध्वजारोहण कार्यक्रमात केलं.

चंद्रपुरात जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या हस्ते तिरंगा फडकवण्यात आला आणि सलामी देण्यात आली, तर अकोला इथं जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. गोंदियाच्या कारंजा इथल्या पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर अन्न आणि औषध प्रशासन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा पार पडला.

वाशिमच्या जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांच्या हस्ते स्थानिक पोलीस कवायत मैदानावर जिल्ह्याचा मुख्य शासकीय ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. बुलढाण्यात पोलिस कवायत मैदानावर जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी ध्वजारोहण केलं. वर्धा इथं जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, तर गडचिरोलीमध्ये जिल्हाधिकारी संजय दैने यांनी ध्वजारोहण केलं.

## कामगार दिन

जगाच्या आर्थिक उन्नतीत कामगारांच्या सहभागाचा गौरव म्हणून आजचा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून साजरा होत आहे. आर्थिक उन्नती आणि सामाजिक हक्कांच्या लढाईतील कामगारांच्या त्यागाचं स्मरण म्हणून आज जगभरात विविध कार्यक्रम, संचलनं होत आहेत. आजच्याच दिवशी १९८६ साली अमेरिकेतल्या शिकागो इथं कामगारांनी निदर्शनं केली होती. यावेळी जमाव हाताबाहेर गेल्यानं अनेक जण

जखमी झाले होते. हा प्रसंग पुढं हे मार्केट प्रकरण म्हणून जगभरात प्रसिद्ध झाला. १९८९ मध्ये युरोपातल्या अनेक सामाजिक संघटनांनी एकत्र येऊन १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला होता. तेव्हापासून १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून साजरा होत असतो.

नागपूर जिल्हा महानगरपालिका कामगार संघटनेद्वारे आज १ मे रोजी कामगार दिन साजरा करण्यात आला. संघटनेचे अध्यक्ष ऍॅड. धर्मपाल मेश्राम यांच्या मार्गदर्शनात पदाधिकाऱ्यांनी संघटनेच्या कार्यालयात स्वतंत्र भारताचे पहिले कामगार मंत्री भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

भारतीय जनता पार्टी चंद्रपूरच्या महाराष्ट्र आटोरिक्षा चालक - मालक आघाडी तर्फे जागतिक कामगार दिनाच्या निमित्तानं ऑटोरिक्षा चालक मालक संघटनेच्या सदस्यांचा सत्काराचा कार्यक्रम वनं, सांस्कृतिक तथा मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आला.

भंडारा तालुक्यात माटोरा इथ अनुभव शिक्षा केंद्र अंतर्गत कामगार दिनानिमित्त कामगारांचे हक्क आणि अधिकार या विषयी मार्गदर्शन करण्यात आल.

## उमेदवारांची घोषणा

लोकसभा निवडणुकीसाठी राज्यात महायुतीचं जागावाटप निश्चित झालं असून भाजपा २८, शिवसेना १६, तर राष्ट्रवादी काँग्रेस ४ जागा लढवणार आहे. शिवसेना नेते उदय सामंत यांनी कोल्हापूर इथं ही माहिती दिली.

लोकसभा निवडणुकीसाठी शिवसेनेनं आणखी तीन उमेदवारांची आज घोषणा केली. ठाणे लोकसभा मतदारसंघातून नरेश म्हस्के, कल्याण लोकसभा मतदारसंघातून श्रीकांत शिंदे, तर नाशिक लोकसभा मतदारसंघातून शिंदे सेनेचे खासदार हेमंत गोडसे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. गोडसे हे चौथ्यांदा लोकसभा निवडणूक रिंगणात उतरणार असून आता त्यांचा सामना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उमेदवार राजाभाऊ वाजे यांच्याशी रंगणार आहे.

## नागपुरातील वाहतूक सुधारणा

नागपूर शहरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासोबतच सिग्नल व्यवस्था एकाचवेळी कार्यान्वीत होण्यासाठी १९७ कोटी ६३ लक्ष रुपयांचा निधी मंजूर झाला असून येत्या जून अखेरपर्यंत वाहतूक सुरळीत करण्याची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी दिल्या.विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात नागपूर शहर व सभोवतालच्या परिसरातील वाहतूक व्यवस्था तसेच पार्कीगचा प्रश्न सोडविण्यासाठी बिदरी यांच्या अध्यक्षतेखाली वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत त्यांनी सूचना केल्या.

नागपूर शहर आणि सभोवतालच्या परिसरात वाहतुकीसंदर्भात उपाययोजना सुचविण्यासाठी उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.शहरातील वाहतूक शाखेचे आधुनिकीकरण व वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी अत्यावश्यक

अत्याधुनिक साधने उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. यामध्ये दहा टोइंग व्हॅन, पाच अतिरिक्त इंटरसेफ्टर वाहनांचा समावेश आहे.

नागपूर शहर आणि  परिसरात २३ अपघात प्रवण स्थळं निश्चित करण्यात आली असून भविष्यात अपघात होणार नाही यादृष्टिनं आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. महानगरपालिकेतर्फे १५ अपघात प्रवण स्थळांवर गतीरोधक, झेब्रा क्रॉसिंग, सूचना फलक, सिग्नल व्यवस्था, अतिक्रमण निर्मुलन तसेच डिव्हायडर दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत. अपघात प्रवण स्थळांवर होणारे अपघात टाळण्यासाठी  या ठिकाणांवर यापूर्वी झालेले अपघात, जीवीत हानी तसेच अपघात टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजना बाबतचे सचित्र माहितीफलक तात्काळ लावण्याचे निर्देश बिदरी यांनी यावेळी दिले.

<u>बिपीन जांभोळकर</u>

भारतीय मानक ब्युरो - बीआयएसचे  अंमलबजावणी आणि कायदेशीर कार्य विभागाचे नोडल अधिकारी बिपीन जांभोळकर यांना नागपूर इथल्या सीबीआय प्रकरणांच्या विशेष न्यायाधीशांनी  लाचप्रकरणात ५ वर्षे सक्तमजुरी आणि १ लाख १० हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. न्यायदंडाधिकाऱ्यांच्या २०.१२.२०१४ च्या आदेशानुसार तक्रारदाराची निर्दोष मुक्तता करण्याच्या निर्णयाविरोधात अपील न करण्यासाठी आरोपींना १५,०००/- रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी सीबीआयनं  जांभोळकर यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला होता.

<u>पब्लिक रिलेशन सोसायटी</u>

पब्लिक रिलेशन सोसायटी ऑफ इंडिया, वर्धा चाप्टरतर्फे महाराष्ट्र राज्याच्या स्थापना दिनानिमित्त 'बदलता महाराष्ट्र' या विषयावर परिसंवादाचं आयोजन आज संध्याकाळी साडेसहा वाजता निसर्ग सेवा समिती, आयटीआय टेकडी, वर्धा इथं करण्यात आलं असून यावेळी महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचे सहयोगी प्राध्यापक डॉक्टर बालाजी चिरडे, विदर्भ साहित्य संघ, नागपूरचे अध्यक्ष प्रदीप दाते आणि निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे उपस्थितांना संबोधित करतील.

<u>(जीएसटी) संकलन</u>

एप्रिल २०२४ मध्ये २ लाख १० हजार कोटी रुपये इतकं वस्तू आणि सेवा कराचं सकल महसुली संकलन झाल्याची माहिती केंद्रीय अर्थमंत्रालयानं दिली आहे. हे आत्तापर्यंतचं विक्रमी संकलन असून, संकलनात वार्षिक १२ पूर्णांक ४ शतांश टक्क्याची वाढ झाली असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे. देशांतर्गत व्यवहार आणि आयातीमध्ये वाढ झाल्यानं वस्तू आणि सेवाकराचं संकलन वाढलं, असं मंत्रालयानं म्हटले आहे.

हवामान

आज सकाळी अकोला इथं विदर्भात सर्वाधिक 43 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सियस इतकं कमाल तापमान नोंदविण्यात आलं. अकोला इथं सातत्यानं तापमान वाढत असून मागील दोन दिवस देखील तापमान 43 अंशाच्या घरात होतं. अकोला जिल्ह्याच्या मागोमाग चंद्रपूर आणि अमरावती इथं 42 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सियस, वर्धा इथं 42 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सियस, तर गडचिरोली आणि वाशिम इथं 42 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सियस इतक्या कमाल तापमानाची नोंद आहे. या सर्व ठिकाणी उष्णता मोठ्या प्रमाणात असून लोकांनी दुपारच्या वेळी घराबाहेर न पडण्याच्या सूचना प्रशासनानं दिली आहे.

उर्वरित विदर्भात नागपूर इथं 41 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सियस, तर यवतमाळ, भंडारा, गोंदिया आणि बुलढाणा इथं तापमान 40 अंशांच्या घरात आहे. सर्वत्र प्रशासनाकडून उष्मा प्रतिबंधक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, आज आणि उद्या बहुतांश जिल्ह्यात हवामान कोरडं राहणार आहे, असा अंदाज हवामान खत्यानं व्यक्त केला आहे.

######